जा.क्र. मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 664 /२०२३
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण
कक्ष क्र. ५१८, चौथा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पुर्व), मुंबई ४०००५१
दि. 11/07/2023

# दक्षता विभागाचे परिपत्रक - ३

विषय- पुनर्विकसीत इमारतीसाठीच्या भोगवटा प्रमाणपत्राबाबत.

म्हाडाच्या विभागीय मंडळांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारती तसेच मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी संबंधित मंडळातर्फे ना हरकत प्रमाणपत्र जारी केले जाते. काम पूर्ण झाल्यानंतर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यासाठी मंडळामार्फत ना हरकत प्रमाणपत्र नियोजन प्राधिकरणास दिले जाते.

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, इमारतीचे काम प्रगतीपथावर असतांना इमारतीच्या खालच्या मजल्यांसाठी भाग भोगवटा प्रमाणपत्र [Part Occupation Certificate] प्रस्तावित केले जाते. इमारतीमध्ये खालच्या मजल्यांवर अधिवास असतांना वरच्या मजल्यांचे बांधकाम करणे हे इमारतीमधील रहिवाशांसाठी अत्यंत धोकादायक आहे.

यास्तव या परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, इमारतीचे काम प्रगती पथावर असतांना इमारतीच्या खालच्या मजल्यांसाठी भाग भोगवटा प्रमाणपत्र प्रस्तावित करण्यात येऊ नये.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ/ ~~मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ~~, कोंकण मंडळ/नाशिक मंडळ/पुणे मंडळ/अमरावती मंडळ / नागपूर मंडळ/ औरंगाबाद मंडळ

प्रत,
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना माहीतीसाठी सादर
उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा यांना माहितीसाठी सादर.